# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

**नागपूर शहर पोलीस आयुक्तालय**

**(पोलीस वार्तापत्र)**

**सायंकाळ**

---

**दिनांक ०४.०५.२०२१ मंगळवार**

**(गुन्हे)**

**१) पो.स्टे. एम.आय.डी.सी — फसवणुक :**

दिनांक ३०.०४.२०२१ चे १०.०० वा चे सुमारास पो.स्टे. एम.आय.डी.सी हद्दीत रमाबाई आंबेडकर, जयताळा, नागपूर येथे राहणारे फिर्यादी सुभाष नत्थुजी वाघमारे वय ६० वर्ष हे आपले मिरचीचे दुकान जयताळा, आखरी बस स्टॉप येथे लावले होते. तेव्हा तेथे अंदाजे २० ते २५ वर्ष वयोगटातील दोन अनोळखी मुले रडत होते. फिर्यादीने त्यांना रडण्याचे कारण विचारले असता त्यांनी सांगीतले कि आमची आईला कोरोणा झाल्याने ती व्होकार्ट हॉस्पीटल येथे भरती आहे. आरोपींनी सांगीतले कि आमचे जवळ सोन्याचे दागीने आहे. दागीनेच्या बदल्यात कोणीही पैसे दयायला तयार नाही. आईचे ऑपरेशनसाठी काहीच पैसे शिल्लक नाही. सोनाराचे दुकाने सर्व बंद असल्याने दागीने विकु शकत नाही. त्यामुळे तुम्ही काही दिवसासाठी सोन्याचे दागीने तुमच्याजवळ ठेवा व आम्हाला पैसे दया. मदत केल्यास तुम्हाला रू ५०,०००/— देवू. असे म्हटले. तसेच आरोपींनी फिर्यादीला सोन्याचे मणी असलेला हार दाखविला व त्यामधील चार मणी चेक करण्यासाठी फिर्यादीला तोडून दिले. फिर्यादीने चेक केले असता ते सोन्याचे निघाले. दिनांक ०२.०५.२०२१ चे १२.०० वा चे सुमारास ते अनोळखी आरोपी फिर्यादी चे घरी आले व त्यांना सोन्याचा हार दिला तो हार तुम्ही ठेवून घ्या आणी त्याबदल्यात ६ लाख रूपये दया. असे म्हटले असता फिर्यादीने त्यांना म्हटले कि मी रू ४,५०,०००/— देवू शकतो. तेव्हा फिर्यादीने त्यांना रू ४,५०,०००/— दिले. नंतर सायंकाळी फिर्यादीने हार चेक केला असता तो हार पितळीचा निघाला अशाप्रकारे फिर्यादीची फसवणुक केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. एम. आय.डी.सी येथे सपोउपनि शामनारायण ठाकुर ९९६००१३९३३ यांनी आरोपींविरूध्द कलम ४२०,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**२) पो.स्टे. कळमना — दुखापत करून जबरी चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक ०३.०५.२०२१ चे १९.३० वा चे सुमारास फिर्यादी मो. इरफान मो. शमी शेख वय ३७ वर्ष रा. सतरंजी पुरा, बडी मश्जिद जवळ, सागर कॉम्प्लेक्स नागपूर, हे पो.स्टे. कळमना हद्दीत हनुमान मंदीर, वैष्णव देवी नगर, नागपूर येथे आपले मित्रासह बसून पैशाची लेनदेन सुरू असतांना आरोपी सोबु उर्फ सोएल शेख खालीद शेख वय २३ वर्ष रा. सतरंजीपुरा, बडी मश्जिद जवळ, नागपूर हा व त्याचा मित्र बंटी उर्फ सय्यद शहजाद अली याचेसोबत येवून आरोपी याने फिर्यादीस शिवीगाळ करून चाकु काढुण फिर्यादीवर दोन वेळा चाकु फिरवला. व फिर्यादीचे डाव्या कमरेवर चाकुने वार करून जखमी केले. फिर्यादी हे खाली पडले असता आरोपीने चाकुचे मुठेने फिर्यादीचे तोंडावर व डोक्यावर मारहान करून फिर्यादीचे पॅन्ट चे खिशातून नगदी रू ९,५००/— जबरीने हिसकावून मित्रासह पळून गेला. याप्रकरणी फिर्यादी याने दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कळमना येथे सपोनि भिमगोंडा पाटील ८८८८३९८१० यांनी आरोपीविरूध्द कलम ३९४ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**पो.स्टे. मानकापूर, सिताबर्डी, यशोधरानगर :**

**१) मानकापूर** – दिनांक ०४.०५.२०२१ चे ११.१५ वा चे सुमारास रतीराम उर्फ छोटू रामचंद्र बोपचे वय ५४ वर्ष रा. प्लॉट नं. २४, पलांदुरकर हाउसिंग सोसायटी, दाभा, नागपूर हे पो.स्टे. मानकापूर हद्दीत दिव्य नगरी मागे, किर्तीधर हाउसिंग सोसायटी, प्लॉट नं. ६ व ७, वर्गीस यांचे घराचे पहील्या माळयावरील भितींला पेटींगचे काम करीत असतांना त्यांचे डोक्याला ईलेक्ट्रीक लाईनचा करंट लागल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी फिर्यादी विनेश जयदेव कंगलवार वय ३० वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. मानकापूर येथे पोउपनि रणदिवे ९३७३९७३६१९ यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**२) सिताबर्डी** – दिनांक ०४.०५.२०२१ चे ०१.०० वा चे सुमारास पो.स्टे. सिताबर्डी हद्दीत म्हाडा कॉम्प्लेक्स समोर, वसंतराव नाईक वसाहत, नागपूर येथे राहणाऱ्या रेखा श्रीकिष्ण गणराज वय ५० वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक ०४.०५.२०२१ चे १२.०० वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. सिताबर्डी येथे मसपोनि देवकर ९३५९९८२८२७ यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**३) यशोधरानगर** – दिनांक ०३.०५.२०२१ चे २१.३० वा चे सुमारास पो.स्टे. यशोधरानगर हद्दीत बंदे नवाज नगर ग्राउंड जवळ, नागपूर येथे राहणारे शमीम शेख वल्द मो. शेख वय ६९ वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक ०४.०५.२०२१ चे ०६.४५ वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. यशोधरानगर येथे सपोउपनि गंगाधर ९९२३८७९३४२ यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

## (ईतर)

**१) पो.स्टे. कपीलनगर पोलीसांची कामगीरी – चोरीचा गुन्हा उघडकीस आणून आरोपीस अटक केल्याबाबत :**

फिर्यादी अशोक राणुजी पहाडे वय ५५ वर्ष रा. प्लॉट नं. ९६, रामाई नगर, मनोज जमारे यांच्या घरी किरायाने, नागपूर यांनी पो.स्टे. ला येवुन रिपोर्ट दिली की, त्यांनी त्याच्या मालकीचा टाटा कंपनीचा २५१५ टरबो १० चक्का ट्रक क्रं. एम.एच/४०/ए.के/०१७१ समोरून हिरवा व मागुन कंथ्था रंग असलेल्या ट्रक ज्याचा चेचिस क्रं. ४४४०२६ एम.टी.झेड ०१६२३१ इंजिन क्र . ६९७ टी.सी.एल.टी.झेड १५८०६० चा दि. ०१/०५/२०२१ रोजी रमाई नगर, जरीपटका रिंग रोड, पोलीस स्टेशन कपिलनगनर च्या समोर दुपारी १२:०० वा. च्या सुमारास उभी करून घरी गेले. दिनांक ०१/०५/२०२१ रोजीचे २२:३० वा. पाहिले असता ट्रक उभा होता. दुसऱ्या दिवशी ०२/०५/२०२१ राजी सकाळी ०७:०० वा. कामाला जाण्याकरीता फिर्यादीचा मुलगा निघाला असता ठेवलेल्या ठिकाणी ट्रक दिसुन आला नाही. म्हणुन फिर्यादीला फोन करून विचारले की गाडी दुसऱ्या ठिकाणी ठेवली आहे काय? ज्या ठिकाणी गाडी ठेवली होती त्या ठिकाणी दिसत नाही. असे सांगितले वरून त्वरीत जावून पाहिले असता गाडी दिसुन आली नाही. आजुबाजुला शोध घेतला. परंतू गाडी मिळून न आल्याने फिर्यादीच्या रिपोर्ट वरून अज्ञात आरोपी विरूध्द कलम ३८० भादंवि चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान कामठी शहराचे रोडवरील सिसीटीव्ही फुटेज तसेच कन्हान शहरात लागले असलेले सीसीटीव्ही फुटेज तपासले असता गुन्हयात चोरीस गेलेले वाहन जबलपुर रोडने पुढे जात असल्याचे दिसुन आल्याने पुढे शोध घेतला असता सदरचे वाहन एका गुलमोहर फॅमीली ढाब्याचे काही अंतरा आधीच एक ट्रक अंधारात रोडचे बाजुला उभा असल्याचा दिसुन आला. सदर ट्रक चा नबंर पाहिले

असता एम.एच/४०/ए.के/०१७१ लिहीले असल्याचे दिसून आले व सदरचा ट्रक शोधत असलेला हाच ट्रक असल्याचे निष्पन्न आल्याने सदर वाहनाचे कॅबीनची पाहणी केली असता कॅबीन मध्ये एक इसम अंगात काळया रंगाचे कपडे घातलेला इसम झोपून असलेला दिसून आला. त्यास उठवून परीचय देवून त्यास नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव नवाज उर्फ नावेद खान वल्द नावाब खान, वय २२ वर्ष, रा बडेगांव, ता उमरवाडा, गोलू टेकरे यांचे घरासमोर, जि छिदंवाडा, असे सांगितले. त्यास नमुद ट्रक बाबत विचारपूस केली असता त्याने सांगितले की, मी एक दिवसाआधी रात्री ०२:०० वा. च्या सुमारास रमाई नगर, जरीपटका रिंग रोड, येथून चोरून आणला डिझेल संपल्यामुळे ट्रक बंद पडला असे सांगितल्याने सदरचा ट्रक वर नमुद आरोपी इसमा कडून जप्त केला. आरोपीने सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली असुन सदर आरोपीला मा. न्यायालयात हजर केले कपिलनगर पोलीसांनी अतिशय अचुक माहीती काढुण नमुद आरोपीस मोठया शिताफीने ताब्यात घेवुन गुन्हयात चोरी गेलेले वाहन दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा प्रमाणे जप्त करून सदर आरोपीवर कायदेशीर कारवाई केली. व सदर गुन्हयाचा पुढील पोहवा बंडु कळंबे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त, परि क्रं. ५ श्री. निलोत्पल व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, जरीपटका विभाग, श्री. रोशण पंडीत यांचे निर्देशाप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल आ. देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रमुख पोउपनिरी. बी. बी. पालकर, पोहवा. बंडू कळंबे गणेश, नापोशि आसिफ शेख, पोशि चंद्रकुमार टेकाम, बलजित ठाकुर राहुल नागदेवे विजय वायदुडे, गजानन गेडाम यांनी केली आहे.

<u>२) पो.स्टे. एम.आय.डी.सी पोलीसांची कामगीरी – घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणून आरोपीस अटक केल्याबाबत :</u>

पो.स्टे एमआयडीसी येथे प्राप्त गुप्त बातमीदाराचे माहीती वरून आरोपी राहुल उर्फ भोकण्या काशीनाथ आकोडे वय २८ वर्षे रा. इंदीरा माता नगर, हिंगणा रोड, नागपुर यास कलम ४५४,३८० भादंवि (घरफोडीचा गुन्हा) अटक करून त्यांचे कडून पो.स्टे एमआयडीसी येथे दाखल

**१) अप.क्र १८६/२१ कलम ४५७,३८० भादवी** मधील फिर्यादी पप्पु गोविंदराव ठाकरे वय २९ वर्षो रा.इंदीरामाता नगर,वार्ड क्र ०६, हिंगणा रोड नागपूर यांचे गुन्हयात चोरी गेलेला १) सोन्याचे मंगळसुत्र वजनी ८ ग्राम किमती रू २४,०००/– २) सोन्याची अंगळी वजनी २ ग्राम किमती रू ६,०००/– ३) सोन्याची अंगठी वजनी ३ ग्राम किमती रू ९,०००/– ४) चांदीचा कमरपट्टा वजनी १२ तोडा किमती रू २,४००/– ५) चांदीच्या पायातील पट्टी ०१ नग वजनी ०५ तोडा किमती रू १,०००/– ६) चांदीच्या पायातील पट्टया वजनी ०५ तोडा किमती रू १,०००/– असा एकुण रू ४३,४००/– चा मुददेमाल जप्त करण्यात आला तसेच

**२) अप क्र ९०५/२० कलम ४५४,४५७,३८०, भादवि** मधील फिर्यादी सौ.ममता विष्णु मून वय ४० वर्षो रा.वानखेडे ले आउट,प्लॉट नं ३५ एकातमता नगर, हिंगणा रोड पो.स्टे एमआयडीसी नागपूर यांचा चारिी गेलेला दोन सोन्याचे ०९ ग्राम चे पदक किमती रू २८,०००/– चा मुददेमाल

**३) अप क्र ८१८/२० कलम ४५७,३८० भादवी** मधील फिर्यादी सौ.ममता विजय मेश्राम वय २७ वर्षो रा. इंदीरामाता नगर नागपुर यांचे चोरी केलेला १) सोन्याची लहाण चैन व त्यात लहान लॉकेट वजनी अ.३ग्राम कि.अं. रू ५,०००/– २) ०२ सोन्याचे अंगठया वजनी ४ ग्राम कि रू ७,०००/– असा एकुण रू १२,०००/– चा मुद्येमाल

**४) अप क्र ७७/२१,कलम ४५४,४५७,३८० भादवी** मधील फिर्यादी शाम झिबलराव चांडगे वय ३६ वर्ष रा.इंदीरामाता नगर नागपुर याचा १) सोन्याची अंगठी ४.८० ग्रॅम कि.अं. रू १३,०००/– २) सोन्याची अंगठी ३.९० ग्रॅम कि.अं. रू ७,८००/– ३) सोन्याची नथ अं. १ ग्रॅम कि.अं. रू ३,९००/– ४) सोन्याचे मंगलसुत्र अंदाजे ३.९४० ग्रॅम कि.अं. रू १५,६००/– ५) सोन्याचे झुमके एक जोड २.५९० ग्रॅम कि.अं. रू ७,८००/– असा एकूण रू ४८,१००/– च्या मुद्देमाल

**५) अप क्र ७०८/१९,कलम ४५७,४५४,३८० भादवी** मधील फिर्यादी वासुदेव पांडुरंग जुगनाहाके वय ६३ वर्ष रा. प्लॉट क्र. ६५, राजगृह नगर जिल्हा परिषद शाळे जवळ नागपुर यांचा चोरी गेलेला एक सोन्याचे मंगळसुत्र पदक असलेले वजन अं.२५ ग्रॅम कि. रू ६०,०००/—

**६) अप क्र १०३/२१ कलम** ४५४,४५७,३८० भादवी मधील फिर्यादी अरूण वल्द महगु सिंग वय ३० वर्षो रा.शुभम नगर,दुर्गा चौक,प्लॉट नं ४९,हिंगणा रोड पोस्टे. एमआयडीसी नागपुर शहर याचा सोन्याची चैन वजनी ०७ ग्राम किमती रू २५,०००/— असा एकुण ०६ गुन्हयातील १) सोन्याचे दागीण्याचा माल ११० ग्राम किमती रू ४,४०,०००/— चा व २) चांदीचे दागीणे १०० ग्राम अंदाजे किमती रू ४०००/— ची असा एकुण रू ४,४४,०००/— चा मुददेमाल वरील गुन्हयात हस्तगत करून नमुद आरोपीवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही मा. अपर पोलीस आयुक्त(दक्षिण विभाग) श्री दिलीप झलके, मा. पोलीस उपायुक्त परी मंडळ क्र. १ श्री. नूरूल हसन, मा. सहा.पोलीस आयुक्त श्री. परशुराम कार्यकर्ते, वपोनी युवराज हांडे, दुपोनि दिनेश लबडे, सपोनि रमेश हत्तीगोटे, सफौ राजाराम ढोरे, नापोशि आशीष दुबे, योगेश बहादुरे, मपोशि योगीता राखडे यांनी केली आहे.



**<u>३) पो.स्टे. बजाजनगर पोलीसांची कामगीरी — चोरीचे गुन्हा उघडकीस आणून आरोपीस अटक केल्याबाबत :</u>**

दिनांक ०२.०५.२०२१ रोजी प्लॉट नं. डी/४, योगीराज आशिष अपार्टमेंन्ट, लक्ष्मीनगर, नागपूर येथे यातील फिर्यादी श्री शंकर संभाजी सोमकुवर वय ४५ वर्षे रा. जयनगर, हिलटॉप पो.स्टे. अंबाझरी, नागपूर हे सुरक्षा रक्षक म्हणुन नोकरी करतात. घटनावेळी फिर्यादी हे त्यांचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅण्डसेट त्यांचे टेबलवर ठेवुन पाण्याची मोटर सुरू करण्याकरीता गेले असता कोणीतरी अज्ञात आरोपीताने त्यांचा मोबाईल हॅण्डसेट चोरून नेला अशा फिर्याद वरून बजाजनगर पोलीस ठाणे, नागपूर शहर येथे गु.रजि.क्र. ७०/२०२१ कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे घटनेची माहिती तात्काळ पोलीस ठाणेचे तपास पथकास देवुन अज्ञात आरोपीताचा शोध घेणेबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने तपास पथक पोलीस ठाणे हद्दीत आरोपीचा शोध घेण्याकरीता सर्तकतेने गस्ती करीत असतांना त्यांना फिर्यादीने सांगितलेल्या वर्णनाचा इसम आठ रस्ता चौक येथे दिसुन आला त्याचेवर तपास पथकाचा संशय बळावल्याने त्यास तात्काळ थांबवुन ताब्यात घेतले व त्याची अंगझडती घेतली असता त्याचे फुलपॅन्टचे खिश्यातुन सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅण्डसेट मिळुन आला. त्यास त्याचे नाव, पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव वैभव नारायण भांडेकर वय २९ वर्षे रा. प्लॉट नं. ३९, मंगलधाम सोसायटी, सिमटाकळी, पो.स्टे. एम.आय.डी.सी. नागपूर असे सांगितले. त्यास मोबाईल हॅण्डसेट

बाबत विचारणा करता तो उडवा–उडवीची उत्तरे देवु लागल्याने त्यास पोलीस ठाणेस आणुन त्याचेकडे बारकाईने विचारपुस केली असता त्याने सदरचा मोबाईल हॅण्डसेट नमुद घटनास्थळवरून चोरी केल्याचे कबुल केले. सदरचा मोबाईल हॅण्डसेट दोन पंचासमक्ष जप्त करून ताब्यात घेण्यात आला आहे. म्हणुन वरील नमुद आरोपीतास गुन्हयात अटक करण्यात आले आहे.

सदर गुन्हयाचे तपासात आरोपीकडे अधिक चौकशी केली असता त्याने यापुर्वी केलेल्या चोरीबाबत माहिती दिल्याने त्याचेकडुन एकुण रू १,७३,०००/– चा मुद्देमाल वेगवेगळया ठिकाणावरून जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. १ श्री. नूरूल हसन, नागपूर शहर, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, सोनेगाव विभाग श्री. पी.एम. कार्यकर्ते नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. महेश चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बजाजनगर पोलीस ठाणे, नागपूर शहर, पोउपनि श्री पराग फुलझेले, सफौ संजयसिह ठाकुर, नापोशि विनोद व्दिवेदी, पोशि सुभाष गजभिये, नितेश वाकडे, नितीन राऊत, मुरलीधर चौधरी, धिरज थोटे यांनी पार पाडली आहे.

**४) पो.स्टे. अजनी पोलीसांची कारवाई – अवैधरित्या जुगार व दारूविक्री तसेच गैरकायद्दाची मंडळ जमवून शासकीय कामात अडथळ व पोलीसांवर हल्ला करून शासकीय वाहनाचे नुकसान करणाऱ्या आरोपींना अटक केल्याबाबत :**

दिनांक ०३.०५.२०२१ चे १९.१५ वा ते २०.१५ वा दरम्यान पो.स्टे. अजनी हद्दीत राहाटेनगर टोली चिन्नु उर्फ काजु नाडे याचे राहते घर व राहाटेनगर टोली वस्तीला लागुन जयवंतनगर येथील सार्वजनिक रोड, नागपूर येथे फिर्यादी पोउपनि आषीश ठाकुर नेमणुक पो.स्टे. अजनी, नागपूर शहर व पोलीस स्टाफ यांना मिळालेल्या माहितीवरून जुगार व प्रोव्हीशन रेड करून ताब्यातील आरोपीना शासकिय वाहनाकडे पायदळ नेत असतांना सध्या कोरोना आजाराचा प्रार्दुर्भाव असल्याने शासनाने जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून, ताब्यातील आरोपींना सोडविण्याचे उददेशाने व शासकीय कामात अडथळा आणण्याचे उद्देशाने आरोपी क्र. १) अल्ताफ प्रकाश लोंढे वय १८ वर्षे रा. रहाटे नगर टोली रामसिंग लोंढे च्या घराजवळ नागपूर २) श्रावण वामन नाडे वय ६५ वर्षे, रा. राहाटेनगर टोली भवानी, ३) धिरज वसंता शेंडे वय ३९ वर्षे रा. राहाटेनगर टोली, वय ३९, रा. राहाटेनगर टोली यश किराणा दुकान जवळ पो.स्टे. अजनी नागपूर ४) वतन रतन नाडे वय २४ वर्षे, रा. राहाटेनगर टोली पो.स्टे. अजनी नागपूर, ५) संदीप खुशाल मानकर वय ३० वर्षे रा. राहाटेनगर टोली पो.स्टे. अजनी नागपूर, ६) दारासिंग जयसिंग लोंढे वय ४६ वर्षे, रा. राहाटेनगर टोली पो.स्टे. अजनी नागपूर, ७) जितेंद्र वामन नाडे वय ३७ वर्षे, रा. राहाटेनगर टोली पो.स्टे. अजनी नागपूर, ८) कैलास अजाबराव हातागडे वय २६ वर्षे, रा. राहाटेनगर टोली पो.स्टे. अजनी नागपूर, ९) प्रताप बकाराम हातागडे वय ४९ वर्षे, रा. राहाटेनगर टोली पो.स्टे. अजनी नागपूर, १०) उमेश सुखदेव मानकर वय २० वर्षे, रा. राहाटेनगर टोली नागेष मानकर चे घराजवळ, पो.स्टे. अजनी नागपूर, ११) निखील गजानन टिपले वय २५ वर्षे रा. वकिलपेठ माता मंदिर जवळ प्लॉट क्र ३२१ पोस्टे इमामवाडा नागपूर, १२) सोनु राजेन्द्र पाटील वय २३ वर्षे रा. बेलतरोडी अशोक नगरी बौध्द विहारा जवळ नागपूर, १३) नयन वासुदेव हावरे वय २२ वर्षे रा. जुना बिडीपेठ तुकोबा ग्राम नागपुर अनिल वाघमारे यांचे घराजवळ पोस्टे सक्करदरा. नागपूर, १४) अनिकेत रविन्द्र पा्त्रे वय १८ वर्षे रा. रहाटे नगर टोली रामसिंग लोंढे च्या घराजवळ नागपूर, १५) प्रविण माणीक लोंढे वय २२ वर्षे रा. रहाटे नगर टोली रामसिंग लोंढे च्या घराजवळ नागपूर, १६) पंकज रामसजीवन सरोज वय २२ वर्षे रा. जादुमहल चौक बजरंगनगर गल्ली नं. ८, पो.स्टे. अजनी नागपूर, १७) कन्ना कल्लु हातागडे वय ४२, रा. राहाटेनगर टोली भवानी माता मंदीर नागपूर, १८) आकाश प्रकाश नाडे वय २१ वर्षे रा. रामटेकेनगर पो.स्टे. अजनी नागपूर, १९) ईश्वर दाजीबा लोंढे वय १९ वर्षे, रा. राहाटेनगर टोली पो.स्टे. अजनी नागपूर, २०) वसंता बहादुर लोंढे वय २३ वर्ष, रा. राहाटेनगर टोली नागेश मानकरचे घराचे बाजुला पो.स्टे. अजनी, २१) सोहन लहु उफाडे वय ३३ वर्षे, रा. राहाटेनगर टोली पो.स्टे. अजनी नागपूर, २२) सावन खुशाल मानकर वय १९ वर्षे रा. राहाटेनगर टोली पो.स्टे. अजनी नागपूर, २३) मिलन काजु नाडे वय ३० वर्षे रा.

राहाटेनगर टोली, पो.स्टे. अजनी, नागपूर शहर, २४) गिता काजु नाडे वय ३५ वर्षे रा. राहाटेनगर टोली पो. स्टे. अजनी नागपूर शहर, २५) सोनी गरिबदास नाडे वय ३५ वर्षे रा. राहाटेनगर टोली पोस्टे अजनी नागपूर शहर, २६) हिरकत राजेश लोंढे वय ३५ वर्षे, रा. राहाटेनगर टोली. पोस्टे अजनी नागपूर शहर, २७) बेबी शंकर मानकर वय ५८ वर्षे, रा. राहाटेनगर टोली, नागपूर शहर, २८) निकीत महेंद्र हातागडे वय ३८ वर्षे रा. राहाटेनगर टोली, पो.स्टे. अजनी नागपूर व दोन विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी गैरकायदयाची मंडळी जमवून पोलीस स्टॉपवर दगडफेक केली तसेच यातील ताब्यात असलेल्या आरोपींतांनी असे करण्यास त्यांना चिथावणी दिली. दगडफेकी मध्ये पोलीस शासकीय वाहन क्र.एमएच/३१/एफआर/५२६३ या वाहनाचे समोरील व बाजुचे काच फोडून अंदाजे रू ३५०००/— चे नुकसान केले. तसेच पोलीस स्टाफ मधे हजर असलेले महिला होमगार्ड १) प्रिया रामाजी निकोडे, २) शिल्पा सुरेश मेंढे, ३) भाग्यश्री मनोहर डोडेवार यांना दगडफेकीमध्ये जखमी केल्याने नमुद आरोपीविरूध्द कलम १८८, २६९, २७०, १४३, १४७, १४९, ३२३, ३३२, ३५३, ४२७ भा.दं.वि. सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा सहकलम, ४, ५ म.जु.का. सहकलम ६५ (ग) म.दा. का. सहकलम ३ संसर्गजन्य आजार प्रतिबंधक कायदा, सहकलम ५१ (बी) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम अन्वये गुन्हा दाखल तपासात घेण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासात दरम्यान यातील एकुन २२ पुरूष व २ विधी संघर्षग्रस्त बालकांचा दाखल नोंद गुन्हयात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने वरिल नमुद आरोपीतांना तपासात कायदेशिर अटक करण्यात आली असुन २ विधी संघर्ष ग्रस्त बालकांना ताब्यात घेवून सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे.

यातील अटक आरोपीतांनी त्यांचे इतर साथीदार यांचे सोबत मिळून गैरकायदयाची मंडळी जमवून पोलीस कारवाईस विरोध करून शासकिय कामात अडथडा निर्माण करून शासकिय वाहनाची तोडफोड करून नुकसान केले असुन नमुद आरोपींचे इतर २० ते २५ अनोळखी महिला व पुरूष आरोपी हे घटनास्थळावरून पळून गेले होते. नमुद आरोपींचा शोध घेत असतांना यातील अनु. क्र. २३ ते २८ या महिला आरोपीचा नोंद गुन्हयात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना गुन्हयाचे तपासात कायदेशिररित्या अटक करण्यात आली आहे.

यातील अनु.क्र. १ ते १० आरोपी हे नोंद गुन्हयातील मुख्य आरोपी असुन नोंद गुन्हयातील इतर फरार आरोपींचे शोध घेण्याचे दृष्टीने वरील अ.क्र. १ ते १० आरोपींना मा. न्यायालया समक्ष हजर करून त्यांचा २ दिवसाची पोलीस कस्टडी रिमांड प्राप्त करण्यात आला आहे. त्याच प्रमाणे इतर अटक आरोपी क्र. ११ ते २८ यांना मा. न्यायालयात हजर करून त्यांचा न्यायालयीन कस्टडी रिमांड मंजुर करण्यात आला आहे.

गुन्हयाचे तपासात अटक आरोपींचे इतर फरार साथीदार यांची नावे निष्पन्न करून त्यांना नोंद गुन्हयात अटक करण्याची तजविज ठेवण्यात आली आहे.

आरोपींकडून एकुण रू १४२४०/— नगदी, वेगवेगळया कंपनीचे एकुन तिन नग मोबाईल हॅण्डसेट कि.अ. रू १४०००/— तसेच त्यांच्या बाजुला घराचे कोपऱ्यात पाच लिटर गावठी दारू असेलेली कॅन किं. अं. रू ५००/—, एक एलईडी टी.व्ही.एमआय कंपनीची किं. अं. रू ३००००/— व एअरटेल कंपनीचा एक सेट अप बॉक्स किं. रू १०००/— असा एकुण रू ५९७४०/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| वरिल प्रमाणे कार्यवाहीच्या अनुषंगाने रहाटेनगर टोळी या वस्तीमध्ये अवैघ्य गावठी दारूच्या विक्री संबधाने दि. ०४/०५/२०२१ सर्च मोहीम राबवून खालील नमुद प्रमाणे इसमांविरूध्द दारूबंदी कायदा अन्वये कारवाई करण्यात आली आहे. | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | अप.क्र. | आरोपीची नावे | मुद्येमाल |
| १ | पो.स्टे. गु.र.क्र. २०५/२०२१ कलम ६५ ग म.दाका | रॉबीन जुगनु लोंढे रा. रहाटेनगर टोळी व इतर ६ आरोपी | मोहाफुलांचा सडवा भरून ठेवलेले एकुन १४ लहान मोठे प्लास्टीकचे ड्रम, तसेच मोहाफुलाची गावठी दारू भरून असलेल्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ५ व १० लिटर क्षमतेच्या एकुन ११ प्लास्टीकच्या डबक्या हस्तगत करून सदर माला मधुन ७ सीए सॅम्पल काढून उर्वरीत मुद्येमाल नाशवंत करण्यात आला. |
| २ | पो.स्टे. गु.र.क्र. २०६/२०२१ कलम ६५ ग म.दाका | शंकर दाजीबा लोंढे रा. रहाटेनगर टोळी व इतर ६ आरोपी | मोहाफुलांचा सडवा भरून ठेवलेले एकुन १२ लहान मोठे प्लास्टीकचे ड्रम, तसेच मोहाफुलाची गावठी दारू भरून असलेल्या ५ व १० लिटर क्षमतेच्या प्लास्टीकच्या एकुन ०९ डबक्या हस्तगत करून सदर माला मधुन ७ सीए सॅम्पल काढून उर्वरीत मुद्येमाल नाशवंत करण्यात आला. |
| ३ | पो.स्टे. गु.र.क्र. २०७/२०२१ कलम ६५ ग म.दाका | उज्वला नाडे रा. रहाटेनगर टोळी व इतर ६ आरोपी | मोहाफुलांचा सडवा भरून ठेवलेले एकुन १२ लहान मोठे प्लास्टीकचे ड्रम, तसेच मोहाफुलाची गावठी दारू भरून असलेल्या ५ व १० लिटर क्षमतेच्या प्लास्टीकच्या एकुन १२ डबक्या हस्तगत करून सदर माला मधुन ७ सीए सॅम्पल काढून उर्वरीत मुद्येमाल नाशवंत करण्यात आला. |
| ४ | पो.स्टे. गु.र.क्र. २०८/२०२१ कलम ६५ ग म.दाका | हसन भगवान लोंढे रा. रहाटेनगर टोळी व इतर ६ आरोपी | मोहाफुलांचा सडवा भरून ठेवलेले एकुन ११ लहान मोठे प्लास्टीकचे ड्रम, तसेच मोहाफुलाची गावठी दारू भरून असलेल्या ५, १० व २० लिटर क्षमतेच्या प्लास्टीकच्या एकुन १० डबक्या हस्तगत करून सदर माला मधुन ७ सीए सॅम्पल काढून उर्वरीत मुद्येमाल नाशवंत करण्यात आला. |
| ५ | पो.स्टे. गु.र.क्र. २०९/२०२१ कलम ६५ (ग) मदाका | कायाबाई बाराजी उफाडे व इतर ३ | एकुन १,४५,०००/—रू. चा मुद्देमााल |
| ६ | पो.स्टे. गु.र.क्र. २१०/२०२१ कलम ६५ (ग) मदाका | कोमल उमेश लोकडे व इतर ३ | २) अंदाजे एकुण १,२०,०००/— रु चा मुद्देमाल |
| ७ | पो.स्टे. गु.र.क्र. २११/२०२१ कलम ६५ (ग) मदाका | विशाल ईश्वर फुलझेले इतर ३ | एकुण १,२०,०००/— रु चा मुद्देमाल |
| ८ | पो.स्टे. गु.र.क्र. २१२/२०२१ कलम ६५ (ग) मदाका | अनुसया शंकर हातागडे व इतर ३ | एकुण १,४०,०००/— रु चा मुद्देमाल |



पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर